ePaper

पार्थ पवारांना क्लीनचीट? जमीन घोटाळ्याप्रकरणी धक्कादायक माहिती समोर!

| वर्ष - 9 | अंक -86 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- याला म्हणतात फिरकीची जादू!
- इंग्लंडच्या खेळाडूकडून इंडियाचा अपमान?
- वचनबद्ध असल्यामुळे निवडणुका जिंकतो!
- स्फोट प्रकरणात NIA ला मोठे यश!

www.mahaenews.com | बुधवार, दि. 19 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**राज्यावर मोठं संकट** पुढील 24 तास धोक्याचे!

# राज्यभरात थंडीची तीव्र लाट!

## १९ आणि २० नोव्हेंबर निर्णायक; महाराष्ट्रात पारा १० अंशांच्या खाली

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून वातावरणात अचानक बदल होऊ लागला आहे. दिवसा उन्हाची तीव्रता क्षणभर जाणवली तरी संध्याकाळ होताच तापमानाचा पारा कोसळू लागला आहे. उत्तरेकडून येणाऱ्या बर्फाळ थंड वाऱ्यांचा राज्यावर जोरदार प्रभाव पडत असून, हवामान खात्याने पुढील २४ तास अधिक धोक्याचे ठरणार असल्याचा इशारा दिला आहे.**



विशेष म्हणजे १९ आणि २० नोव्हेंबरला राज्यावर थंडीची तीव्र लाट (Cold Wave) येण्याची अधिकृत सूचना देण्यात आली आहे.

### उत्तर भारतात बर्फाळ थंडी; महाराष्ट्रातही परिणाम स्पष्ट

हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि बिहार या राज्यात थंडीचा कडाका विक्रमी पातळीवर आहे. काही ठिकाणी तापमान शून्य अंशांच्या आसपास फिरत असून, बर्फवृष्टीमुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

या थंड वाऱ्यांचा थेट परिणाम महाराष्ट्रावर दिसू लागला आहे. परभणी आणि जेऊरमध्ये फक्त ७ अंश, जळगाव ७.१ अंश, निफाड ८.३, आहिल्यानगर ८.४ अंश असे तापमान नोंदले गेल्याने महाराष्ट्रातही थंडीची लाट स्पष्ट जाणवू लागली आहे. पुणे, मालेगाव, महाबळेश्वर, गोदिया, भंडारा, यवतमाळ, वाशीम या भागांमध्ये पारा १० अंशांच्या खाली घसरला आहे.

### दक्षिण भारतात उलट परिस्थिती — मुसळधार पावसाचा इशारा

एकीकडे देशातील उत्तरेकडील राज्ये थंडीची लाट झेलत असताना, दक्षिण भारतात पूर्ण उलट परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारतीय हवामान विभागाने केरळ, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशमध्ये अतिशय मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे.

समुद्रावर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे बंगालच्या उपसागरात वातावरण अस्थिर झाले असून, १९ व २० नोव्हेंबरला अतिवृष्टीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे देशात हवामानाच्या दोन टोकाच्या परिस्थितीचे चित्र पाहायला मिळत आहे.

### थंडीचा कडाका वाढताच महाराष्ट्रातील लोक त्रस्त

राज्यातील ग्रामीण आणि शहरी परिसरात सकाळच्या वेळेला दाट धुके आणि गारवा जाणवत आहे. पारा अचानक घसरल्याने विशेषतः पहाटेच्या वेळेस रस्त्यावर हालचाली मर्यादित झाल्या आहेत.

काही भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी, • वाहतूक मंदावली, ग्रामीण भागात गोठणारी थंडी, वृद्ध, लहान मुले आणि रुग्ण त्रस्त अशी परिस्थिती पहायला मिळत आहे.

### गोंदियात दाट धुक्याची चादर — ३ दिवसांपासून स्थिती गंभीर

गोंदिया जिल्ह्यात मागील तीन-चार दिवसांपासून थंडीचा जोर अचानक प्रचंड वाढला आहे. रात्री तापमान कोसळून ८ ते ९ अंशांपर्यंत खाली येत आहे. पहाटे शहरावर दाट धुक्याची चादर पसरलेली दिसते.

दृश्यमानता इतकी कमी झाली आहे की काही मीटर अंतरावरही व्यक्ती किंवा वाहन दिसत नाही. मुख्य रस्त्यांवर वाहनांना हेडलाइटसह कमी वेगात चालावे लागत आहे. देवरी, सालेकसा, तिरोडा परिसरात धुक्याचा प्रभाव सर्वाधिक. देवरी नगरपंचायत मैदानात सकाळच्या वेळेस मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांचा अक्षरशः संभ्रम उडत आहे. धुक्यामुळे समोरचा माणूस काही फुटांवर असला तरी ओळखता येत नाही, अशी परिस्थिती आहे.

नागरिकांनी आता उबदार कपड्यांचा आधार घेतला असून, थंडीपासून बचाव करण्यासाठी रस्त्यांवरील चहा–भजी केंद्रांवरही गर्दी वाढली आहे.

### तज्ज्ञांची चेतावणी — आणखी ४ ते ५ दिवस थंडी वाढणार

हवामान तज्ज्ञांच्या मते, थंडीचा हा कडाका एक-दोन दिवसांचा नाही. पुढील ४ ते ५ दिवस महाराष्ट्रात तापमान २ ते ३ अंशांनी आणखी घसरू शकते.

### उत्तर भारतातील थंड वाऱ्या अधिक तीव्र होणार

• महाराष्ट्रात कोल्ड वेवची परिस्थिती, • विदर्भ आणि मराठवाड्यात थंडीचे प्रमाण जास्त, • पुणे, नाशिक, गोदिया, यवतमाळ या जिल्ह्यांत परिस्थिती गंभीर. तज्ज्ञांनी विशेषतः लहान मुले, वृद्ध, दमा/अस्थमा रुग्ण यांनी काळजी घ्यावी असा इशारा दिला आहे. रात्र आणि पहाटे बाहेर पडताना उबदार कपडे, टोपी, मफलर वापरणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

### शेतकऱ्यांसाठीही आव्हान — थंडीची लाट पिकांवर परिणाम

थंडीची लाट वाढल्याने राज्यातील अनेक हिवाळी पिकांवरही परिणाम होऊ शकतो. • भाजीपाला पिकांवर गारठ्याचा फटका, • कांदा, टोमॅटो, वांगी यांसारख्या पिकांची वाढ मंदावण्याची शक्यता, • मका, गहू, चणा या पिकांना संथ वाढ. विदर्भात विशेषतः हंगामी पिकांवर काळा पडा किंवा थंडीमुळे डाग येण्याची शक्यता वाढली आहे.

## पुणे गारठले! पारा ९.४°C वर; तीन वर्षांतील विक्रमी नीचांकी तापमानाची नोंद

पुणे शहरात आर्द्रता कमी झाल्यामुळे आणि उत्तरेकडील थंड वाऱ्यांमुळे किमान तापमानात लक्षणीय घट होऊन, शिवाजीनगर येथे ९.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, जी तीन वर्षांतील नीचांकी आहे. आर्द्रतेचे कमी झालेले प्रमाण, निरभ्र आकाश आणि उत्तरेकडून सातत्याने येणाऱ्या थंड वाऱ्यांचा वाढलेला प्रभाव यामुळे पुणे शहरातील किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. परिणामी शहरात अनेक ठिकाणी किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी नोंदविले गेले आहे. लोणी काळभोर (हवेली) येथे ६.९ अंश सेल्सिअस अशा नीचांकी तापमानाची नोंद झाली, तर पुण्यात शिवाजीनगर येथे ९.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, गेल्या तीन वर्षांतील सर्वांत नीचांकी तापमान मंगळवारी नोंदविले गेले. पुण्यात गेल्या दोन दिवसांपासून कमी होणाऱ्या किमान तापमानामुळे पुणेकरांना चांगलीच हुडहुडी भरली आहे.

## बँकांकडून योग्य प्रतिसाद नाही

## नऊ महिने बंद असलेली स्वनिधी योजना सुरू

# खरंच फेरीवाले आत्मनिर्भर होणार?

## स्वनिधी योजना पुन्हा सुरू झाली

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**फेरीवाल्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी सुरु करण्यात आलेली आत्मनिर्भर योजना गेली ९ महिने बंद होती, परंतु योजना पुन्हा सुरु झाल्यानंतर बँकांकडून फेरीवाल्यांना योग्य प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार फेरीवाल्यांकडुन करण्यात आली आहे. फेरीवाल्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी योजना बनवली आहे, परंतु बँकाच्या चुकीच्या प्रतिसादामुळे मुळ हेतूलाच हरताळ फासण्यात येत आहे. आत्मनिर्भर होण्यापासून चुकीच्या प्रतिसादामुळे फेरीवाले दूर लोटले जात असल्याची बाब समोर आली आहे.**



९ महिने बंद असलेल्या योजनेला केंद्र सरकारने ३१ मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजने अंर्तगत तीन टप्प्यामध्ये पेसै दिले जातात. पहिल्या टप्प्यातील पैसे परत फेड केल्यानंतर दुसऱ्यांदा टप्प्याचा फायदा घेण्यासाठी अर्जदार पात्र होतो. यासाठी नव्याने फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही, पूर्वीचे कर्ज बंद करुन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र करण्याचे अधिकार बँकांकडे आहेत परंतु बँकांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे फेरीवाल्यांना महापालिकेमध्ये खेटया घालाव्या लागतात. आता पर्यंत ६२४८९ अर्ज आले होते त्यातील ४६४४५ फेरीवाल्यांना या योजनेचा फायदा झाला आहे. एकूण ७४.३३ टक्के फेरीवाल्यांना याचा फायदा झाला आहे. यात ६२ हजार अर्जापैकी पहिल्या टप्प्यातील ४६४४५ फेरीवाल्यांना कर्ज मिळाले आहे, दुसऱ्या टप्प्यात ११५७१, तिसऱ्या टप्प्यात १६८६ फेरीवाल्यांना या योजनेचा लाभ घेता आला आहे. पहिल्या टप्प्यातील लाभधारक पाहता दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील लाभधारकांची संख्या खूप कमी आहे. याला बँकांचा अयोग्य प्रतिसाद कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. बँकांचा योग्य प्रतिसाद मिळाल्यास उर्वरीत टप्प्यातील लाभधारकांची संख्या वाढण्यास मदत होईल आणि फेरीवाले आत्मनिर्भर बनण्यास अजून भक्कम पाऊल पडेल. योजनेतील फेरबदलांनुसार किंवा पहिल्या टप्प्यात फेरीवाल्यांना पुर्वी जे १० हजार रुपये मिळणार होते त्यामध्ये वाढ करुन ती रक्कम आता १५ हजार केली आहे, टप्प्यातील कर्ज २० हजाराहुन वाढून २५ हजार केले आहे, तिसऱ्या टप्प्यातील २५ हजाराहून वाढवून ५० हजार करण्यात आले आहे.नगरवासीयांच्या आर्थिक

## योजना गेली ९ महिने बंद होती

यासाठी नव्याने फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही, पूर्वीचे कर्ज बंद करुन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र करण्याचे अधिकार बँकांकडे आहेत परंतु बँकांकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्यामुळे फेरीवाल्यांना महापालिकेमध्ये खेटया घालाव्या लागतात. आता पर्यंत ६२४८९ अर्ज आले होते त्यातील ४६४४५ फेरीवाल्यांना या योजनेचा फायदा झाला आहे. एकूण ७४.३३ टक्के फेरीवाल्यांना याचा फायदा झाला आहे.

कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तु, आणि सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजवतात त्यांना त्यांना पथविक्रेता म्हणतात.अग्रणी बँकेने दिलेल्या सूचनेनुसार पहिल्या टप्प्यातील कर्ज बंद झाल्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या कर्जासाठी दुसरा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही, पहिले कर्ज फेडल्यानंतर ते बंद करण्याची प्रक्रीया बँकांनीच करायची आहे. त्यानंतर दुसरया कर्जासाठी फेरीवाले आपोआप पात्र होतील त्यासाठी महापालिकेत जाण्याची आवश्यकता नाही. फेरीवाल्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी सुरु करण्यात आलेली आत्मनिर्भर योजना गेली ९ महिने बंद होती, परंतु योजना पुन्हा सुरू झाल्यानंतर बँकांकडून फेरीवाल्यांना योग्य प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार फेरीवाल्यांकडुन करण्यात आली आहे. फेरीवाल्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी योजना बनवली आहे, परंतु बँकाच्या चुकीच्या प्रतिसादामुळे मुळ हेतूलाच हरताळ फासण्यात येत आहे. आत्मनिर्भर होण्यापासून चुकीच्या प्रतिसादामुळे फेरीवाले दूर लोटले जात असल्याची बाब समोर आली आहे.

९ महिने बंद असलेल्या योजनेला केंद्र सरकारने ३१ मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजने अंर्तगत तीन टप्प्यामध्ये पेसै दिले जातात. पहिल्या टप्प्यातील पैसे परत फेड केल्यानंतर दुसऱ्यांदा टप्प्याचा फायदा घेण्यासाठी अर्जदार पात्र होतो.

# चाकणमध्ये ठाकरे-शिंदे गट एकत्र

## सुरेश गोरे यांना आदरांजली म्हणून त्यांच्या पत्नीला ठाकरे गटाचा पाठिंबा

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेनेत फुट पडल्यापासून राज्याच्या राजकारणात शिवसेना ठाकरे गट आणि शिंदे गट एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जातात. अशातच राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटांमध्ये चाकण नगराध्यक्ष निवडणुकीसाठी एकत्र आल्याची माहिती समोर आली आहे. शिंदे आणि ठाकरे गटाच्या या युतीमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे गटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार मनीषा सुरेश गोरे यांचा अर्ज भरताना ठाकरे गटाचे आमदार बाबाजी काळे आणि शिंदे गटाचे आमदार शरद सोनवणे हे दोघेही एकत्र उपस्थित होते. एका वृत्तवाहिनीशी बोलताना बाबाजी काळे म्हणाले की, खेड-आळंदीचे दिवंगत आमदार सुरेश गोरे यांच्या निधनानंतर ही पहिली निवडणूक होत आहे. "त्यांच्या पत्नी मनीषा गोरे नगराध्यक्षपदासाठी उभ्या आहेत. अशा प्रसंगी राजकारण बाजूला ठेवून, दिवंगत आमदारांना आदरांजली म्हणून आम्ही त्यांना पाठिंबा दिला आहे. पण ही युती नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. बाबाजी काळे म्हणाले की, उद्धव

## जवळच्या व्यक्तींना तिकिट

शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील आमदार, खासदार आणि प्रमुख नेत्यांना स्पष्ट शब्दांत फटकारले.काही नगरसेवकांनी आमदारांविरोधात शिंदेंकडे तक्रारी केल्या होत्या. आमदार आपल्या जवळच्या व्यक्तींना तिकिट मिळावे यासाठी दबाव आणत आहेत, नेतृत्वावर विश्वास ठेवून आलेल्या विद्यमान नगरसेवकांच्या कामात अडथळे निर्माण होत आहेत, असा त्यांचा आरोप होता. विशेषतः पश्चिम उपनगरातील काही इच्छुक विभागप्रमुख आणि माजी नगरसेवकांनीही कामात अनावश्यक हस्तक्षेप केल्याची नाराजी व्यक्त केली.

ठाकरे आणि संपर्क प्रमुख सचिन अहिर यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे हा निर्णय फक्त चाकण नगराध्यक्ष पदापुरता मर्यादित आहे. तालुक्यातील राजगुरुनगर आणि आळंदी येथे आम्ही स्वबळावर लढत आहोत," असेही बाबाजी काळे यांनी स्पष्ट केले. मुंबई महानगर पालिका निवडणूक जवळ येत असताना पक्षातील अंतर्गत मतभेद उफाळून येऊ लागले आहेत.

**जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान** सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# कोडिंगपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत प्रशिक्षण!

## विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




कार्यक्रमास सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खंपरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे संस्थापक मधुकर रेड्डी आणि रोबोटेक्स इंडियाच्या पायल मनन उपस्थित होते. हा उपक्रम लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडियाच्या सहकार्याने राबविण्यात आला आहे.

रोबोटिक्स लॅबमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक ते ॲडव्हान्स कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाणार असून, शनिवार, रविवार आणि संध्याकाळच्या वेळेत विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. या सुविधा महापालिका तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुल्या आहेत.

> महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्तेचे आणि नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण ही काळाची गरज आहे. काही देशांमध्ये हे शिक्षण प्राथमिक स्तरापासून सुरू होते. पिंपरी-चिंचवडमध्ये अशी सुविधा उपलब्ध होणे ही मोठी पावले आहे."
> **-शेखर सिंह,** महापालिका आयुक्त

**रोबोटिक्स व एआयचे प्रशिक्षण शहरातील विद्यार्थ्यांसाठी सुरू**
**सप्ताहांत विशेष कार्यशाळा,**
**महापालिका व खासगी शाळांना प्रवेश**
**विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धांसाठी तयार करण्याचे उद्दिष्ट**

# खोदकामामुळे डिलक्स चौक-काळेवाडी रस्त्याची दुरवस्था

## नागरिक त्रस्त; अपघातांचा धोका वाढला, महापालिकेकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'डिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.**



काळेवाडी मुख्य रस्ता हा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो वाहने आणि पादचारी या मार्गाने प्रवास करतात. मात्र, खोदकामानंतर रस्त्याची पृष्ठभाग दुरुस्त न झाल्याने पावसाळ्यात खड्डयांची संख्या वाढली आहे. चिखलामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.

स्थानिक रहिवासी म्हणाले, "महापालिकेने रस्ता खोदला, पण तो पुन्हा नीट करण्याची तसदी घेतली नाही. पावसामुळे खड्डे आणि चिखल वाढले आहेत, यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत."

कायदा काय सांगतो? महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६३ आणि ६४ नुसार रस्ते, गटारे आणि पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि दुरुस्ती करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. खोदकामानंतर रस्त्याची दुरुस्ती न करणे हे या तरतुदींचे उल्लंघन मानले जाते.

**खड्डे आणि चिखलामुळे वाहतूक विस्कळीत**
**महापालिकेच्या हलगर्जीपणावर नागरिक संतप्त**
**तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा**



भूमिका

# नवे फौजदारी कायदे येतील

**देशात १ जुलैपासून 'भारतीय न्याय संहिता', 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' आणि 'भारतीय साक्ष्य अधिनियम' हे नवे फौजदारी कायदे लागू होणार आहेत. ही नवी फौजदारी न्याय व्यवस्था प्रत्यक्ष राबवण्यास कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा, सरकारी अधिकारी तयार आहेत का, हा प्रश्न आहे.**

केंद्र सरकारने अलीकडेच, या कायद्यांचा समावेश सरकारी यंत्रणांनी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या सेवा-प्रशिक्षणात करावा, असा सल्ला राज्य सरकारांसह सर्व संबंधितांना दिलेला आहे. भारतीय दंड संहितेत ५११ कलमे आहेत, त्याऐवजी आता ३५८ कलमे असलेली 'भारतीय न्याय संहिता' लागू होणार आहे. त्यात २० नव्या प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आणि ३३ गुन्ह्यांच्या शिक्षेत बदल करण्यात आलेला आहे. 'महिला आणि बालके यांच्यासंबंधीचे गुन्हे' असे नवे प्रकरण नव्या संहितेत समाविष्ट आहेच, शिवाय दहशतवाद, झुंडबळी, संघटित गुन्हेगारी, वंश/ जात वा सामाजिक शत्रुत्वातून केले जाणारे गुन्हे यांचाही स्पष्ट उल्लेख नव्याने झालेला आहे. 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' ही 'फौजदारी प्रक्रिया कायदा' (क्रिमिनल प्रोसीजर कोड) ऐवजी लागू होणार असून त्यातील कलमे मात्र पूर्वीच्या ४८४ ऐवजी आता ५३१ आहेत. यात दोन नवीन प्रकरणांची भर पडल्याने एकूण प्रकरणांची



संख्या ३९ गेली असून यांपैकी एकंदर ३५ कलमांनुसार, गुन्हे-तपासाला कालमर्यादा घालण्यात आलेली आहे. दूरसंवादासारख्या (ऑडिओ/ व्हीडिओ) तंत्रज्ञानाचा उल्लेख यात आहे. 'भारतीय साक्ष्य अधिनियम' मध्ये विद्यमान 'पुरावा कायद्या'तील १६७ ऐवजी १७० कलमे आहेत. यापैकी २४ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.कोणत्याही कायद्याचा खरा कस लागतो तो त्याच्या अंमलबजावणीतच. मुळात आपली एकंदर फौजदारी न्याय व्यवस्था (पोलीस वा अन्य तपासयंत्रणा, न्यायदान यंत्रणा आणि तुरुंगयंत्रणा ) आधीच खूप ओढगस्तीत कार्यरत असताना, नवीन कायदे विकसित आणि परिपक्व होण्यासाठी काही वर्षे लागतील. भारतीय दंड संहिता आणि इतर कायद्यांच्या बाबतीतही असेच घडले होते; पण ते ब्रिटिशांच्या काळात! इथे ते कायदे रुजल्यानंतर, विकसित झाल्यानंतर नवे कायदे आणले जात आहेत आणि देशभर पुरेशी प्रशिक्षणसत्रे घेतल्याविना तसेच पुरेशा संख्येने मनुष्यबळ असल्याविनाच अमलातही येत आहेत. जेव्हा जिल्ह्याजिल्ह्यांतील न्यायालयांत हे कायदे अर्थ लावण्यासाठी (खटल्यांद्वारे) येतील तेव्हा खरी परीक्षा सुरू होईल. ही आव्हाने व्यापक प्रशिक्षणाची निकड आणि महत्त्व अधोरेखित करतात. 'इंडिया जस्टिस रिपोर्ट-२०२२' नुसार, भारताच्या पोलीस दलांतील एकंदर मनुष्यबळ २० लाख ९४ हजार आहे. पोलीस अधिकाऱ्यांसाठी केवळ २११ प्रशिक्षण संस्था आहेत. राज्याराज्यांतील पोलीस दले आणि त्यांतील प्रशिक्षणसंस्था यांचे प्रमाण निरनिराळे असले तरी, देशभरात एकंदर पाहाता सरासरी प्रत्येक संस्थेने १२,७४४ व्यक्तींना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. पोलिसांसाठी जी काही आर्थिक तरतूद असते, तिच्या केवळ १.३ टक्के रक्कम प्रशिक्षणाला मिळते, असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याही रकमेपैकी सरासरीने केवळ ८४ टक्केच रकमेचा वापर झाला आहे. पोलिस प्रशिक्षणासाठी तरतूद तुटपुंजी ठरतेच, शिवाय आणखी एक समस्या म्हणजे प्रशिक्षणासाठी एकावेळी किती कर्मचाऱ्यांना पाठवणार, हा राज्यांपुढला प्रश्न. तो थेटच मनुष्यबळ-संख्येशी निगडित आहे. याच अहवालात मंजूर पदे आणि वास्तविक संख्या यांच्यात तब्बल २२.१ टक्के तफावत असल्याचा उल्लेख आहे. तंत्रज्ञानाचा वापर आणि पोलिस दलाच्या आधुनिकीकरणातून हा प्रश्न सोडवता आला असता. तथापि, केवळ दोनच (तुलनेने लहान) राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशानेच (गुजरात, अरुणाचल प्रदेश आणि पुद्दुचेरी) पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केलेली तरतूद पूर्णपणे वापरली आहे.राज्यांच्या तुरुंग व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याच्या क्षमतेबाबतही प्रश्न आहेतच. देशभरात तुरुंग- कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता आहे. हे आदर्श प्रमाण साध्य करण्यासाठी २,७७० पदांची आवश्यकता असताना, देशभरात केवळ १,३९१ पदांना 'मंजुरी देण्यात आली' आहे आणि त्याहीपैकी केवळ ८८६ पदेच प्रत्यक्ष भरण्यात आली आहेत.

## प्रासंगिक »

### हसीनांना हाकलाच!

***आंतरराष्ट्रीय संकेतांकडे दुर्लक्ष करून आपण जुनी मैत्री निभावत बसलो, तर भविष्यात आपल्यालाही फार मित्र उरणार नाहीत...***

बांगलादेशातील सत्ताभ्रष्ट पंतप्रधान शेख हसीना यांच्याविरुद्ध तेथील एका लवादाने खटला चालवून, सोमवारी अपेक्षेप्रमाणे एका प्रकरणात त्यांना मृत्युदंडाची शिक्षाही सुनावली. गतवर्षी ५ ऑगस्ट रोजी बांगलादेशातील सरकारविरोधी निदर्शने तीव्र झाली नि हसीनाबाईंना जिवाच्या आकांताने भारतात पळ काढावा लागला. विद्यमान सरकारच्या दृष्टीने दक्षिण आशियातील सर्वांत मैत्रीघन राष्ट्रप्रमुखाचा अशा प्रकारे राजकीय शेवट झाला. हसीनांच्या पलायनाने नरेंद्र मोदी सरकारच्या बांगलादेश धोरणाचेही हसे झाले. शेख हसीना २००९ पासून १५ वर्षे सत्तेवर होत्या. विशेषत: २०१५ नंतर भारत-बांगलादेश संबंध कधी नव्हे इतके सुधारले. ऊर्जा, दूरसंचार, व्यापार अशा क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे करार झाले. परंतु एखाद्या राष्ट्रप्रमुखाला मर्यादेपलीकडे डोक्यावर घेतले की काय होते याची प्रचीती आपल्याला आलीच.

पवनार ते पत्रादेवी म्हणजे नागपूर ते गोवा असा ८०२ किलोमीटरचा शक्तिपीठ द्रुतगती महामार्ग तसा अचानकच जाहीर झाला; त्याला स्थगिती मात्र अपेक्षितपणे मिळाली! १२ जिल्ह्यांतील ३५ तालुक्यांमधील २८ हजार एकर भूसंपादनाचे राजपत्र प्रसिद्धीस देण्यात आले.

# शक्तिपीठ महामार्ग: प्राधान्यक्रमांचा प्रश्न!

कोणत्या शेतीतून मार्ग जाणार हे शेतकऱ्यांना समजले आणि राज्यभरातील एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. खरे तर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपासून ना हा मार्ग सुरू होतो ना तिथे थांबतो. तुळजापूरची आई भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, अंबाजोगाईची योगेश्वरी आणि माहुरची रेणुका या देवी मंदिरांच्या धार्मिक पर्यटनाला या मार्गामुळे प्रोत्साहन मिळेल असा सरकारचा दावा. १५ तासांचे हे अंतर आठ तासांपर्यंत येईल आणि धार्मिक पर्यटनाला गती मिळेल असे सांगण्यात येते. पण त्यासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे सुमारे एक लाख जण बाधित होऊ शकतात, असा शेतकऱ्यांचा दावा. शक्तिपीठाचा मार्ग करण्यापूर्वी नागपूर-मुंबई हा महामार्ग सुरू झाला; पण तो मुंबईपर्यंत पुरेशा गतीचा नाही. त्यामुळे या मार्गाचा आर्थिक उलाढालीस कसा आणि किती फायदा झाला याचा अद्याप कोणी अभ्यास केला नाही.




मुंबईपर्यंत पोहोचण्यातच तूर्तास अडचणी असल्याने 'समृद्धी'चे घोडे तसे अडलेलेच आहे. असे असताना एक नवा मार्ग प्रस्तावित झाला. उपविभागीय अधिकाऱ्यांना जमीन संपादनाचे अधिकारही देण्यात आले. ज्या शेतकऱ्यांची जमीन या मार्गात प्रस्तावित आहे असे शेतकरी एकत्र आले. त्यांनी बैठका घ्यायला सुरुवात केली. नांदेडच्या हदगावपासून ते कोल्हापूरच्या कागलपर्यंतच्या बैठकीत प्रश्न उपस्थित करण्यात आला : धार्मिक पर्यटन महत्त्वाचे की शेती?अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने निवृत्त न्यायमूर्ती टी. एस. नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती शक्तिपीठ महामार्गाची गरज आणि आणि व्यवहार्यता तपासण्यासाठी नेमली. या समितीनेही हा मार्ग व्यवहार्य नसल्याचे निष्कर्ष काढले. एका बाजूला शक्तिपीठ महामार्गाची गरज काय, असा प्रश्न राज्यातील शेतकरी उपस्थित करत असताना त्याचे उत्तर सरकारकडून दिलेच जात नाही. शक्तिपीठ महामार्गाची माहिती मिळविणाऱ्या लातूरच्या कार्यकर्त्यांनी या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाला आहे का, असा प्रश्न माहिती अधिकारात विचारला. रस्तेविकास महामंडळाकडून त्याला नाही असे उत्तर आले. हा मार्ग तयार होण्यापूर्वी कोणत्या अभियंत्याने त्याचे सर्वेक्षण केले, असा प्रश्नही विचारला जातो. शेतकऱ्यांच्या मते दोन वेळा ड्रोन सर्वेक्षणाने मार्गाचे रेखांकन करण्यात आले. एका खासगी कंपनीकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे रस्ते ठरविण्यात आल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. खरे तर शक्तिपीठास येणारा भाविक तसा मध्यमवर्गीय किंवा अल्प उत्पन्न गटातील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

भाजपने नाकारली उमेदवारी

## उदयनराजे समर्थकाला राष्ट्रवादीची उमेदवारी

# सातार्‍यात मोठी राजकीय घडामोड!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**खासदार उदयनराजेसमर्थक भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा सुवर्णा नरेंद्र पाटील यांनी पालिका निवडणुकीची उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाने त्यांना सातारा पालिकेच्या नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर करून भाजपला पक्षांतर्गत आव्हान उभे केले आहे.**

## शशिकांत शिंदेंनी साधली संधी!




### भाजपकडून उमेदवारी नाकारली

या वेळी काँग्रेसचे बाबासाहेब कदम, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस नरेश देसाई, जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील, काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. दत्तात्रय धनावडे, शिवसेनेचे नरेंद्र पाटील आदी उपस्थित होते. या बैठकीत महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवार म्हणून सुवर्णा पाटील यांनी नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज दाखल केला.

पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत सोमवारी होती. महाविकास आघाडीच्या वतीने नगराध्यक्षपदासाठी अनेक जण इच्छुक होते. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांशी चर्चा करून तोडीस तोड उमेदवार देण्याबाबत डावपेच आखले होते. सुवर्णा पाटील यांना भाजपने नगरसेवकपदाची उमेदवारी नाकारली. त्यामुळे त्यांनी पक्षांतराचा निर्णय घेतला. भाजपकडून उमेदवारी नाकारली गेलेल्या सुवर्णा नरेंद्र पाटील यांनी राष्ट्रवादीकडे उमेदवारी मागितल्यानंतर आमदार शशिकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे पक्षाचे उपनेते प्रा. नितीन बानुगडे पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजीतसिंह देशमुख यांच्याशी विचारविनिमय करून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वतीने त्यांना उमेदवारी देण्याचे ठरवले.या वेळी काँग्रेसचे बाबासाहेब कदम, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस नरेश देसाई, जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील, काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. दत्तात्रय धनावडे, शिवसेनेचे नरेंद्र पाटील आदी उपस्थित होते. या बैठकीत महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवार म्हणून सुवर्णा पाटील यांनी नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज दाखल केला.खासदार उदयनराजे भोसले व राजघराण्याशी एकनिष्ठ असलेले संग्राम बर्गे, अक्षय मतकर, संजय पाटील, सागर पावशे, विनोद मोरे, प्रशांत आहेरराव, रवी माने तर महिलांमधून शिवानीताई कळसकर, अनिता जगताप व सुवर्णा पाटील यांची उमेदवारी निश्चित असताना त्यांना उमेदवारी मिळाली नाही. हे सर्वजण निवडणूक लढण्याच्या तयारीत होते. त्यापैकी सुवर्णा पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश करून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.उमेदवारी मिळाली नाही ते नेमकी काय भूमिका घेतात याकडे खा.उदयनराजे समर्थकांसह शिवेंद्रराजेंच्या समर्थकांचे लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान आजच्या या घडामोडीनंतर भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा सुवर्णा नरेंद्र पाटील यांनी पालिका निवडणुकीची उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाने त्यांना सातारा पालिकेच्या नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर करून भाजपला पक्षांतर्गत आव्हान उभे केले आहे. खासदार उदयनराजेसमर्थक भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा सुवर्णा नरेंद्र पाटील यांनी पालिका निवडणुकीची उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाने त्यांना सातारा पालिकेच्या नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर करून भाजपला पक्षांतर्गत आव्हान उभे केले आहे. पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत सोमवारी होती. महाविकास आघाडीच्या वतीने नगराध्यक्षपदासाठी अनेक जण इच्छुक होते. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांशी चर्चा करून तोडीस तोड उमेदवार देण्याबाबत डावपेच आखले होते. सुवर्णा पाटील यांना भाजपने नगरसेवकपदाची उमेदवारी नाकारली.भाजपकडून उमेदवारी नाकारली गेलेल्या सुवर्णा नरेंद्र पाटील यांनी राष्ट्रवादीकडे उमेदवारी मागितल्यानंतर आमदार शशिकांत शिंदे यांनी महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे पक्षाचे उपनेते प्रा. नितीन बानुगडे पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजीतसिंह देशमुख यांच्याशी विचारविनिमय करून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वतीने त्यांना उमेदवारी देण्याचे ठरवले.

# व्यापार्‍यांकडून ५ डिसेंबर रोजी लाक्षणिक बंद

## राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बंद पाळण्याचा निर्णय घेतला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यभरातील व्यापार्‍यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी लाक्षणिक बंद पाळण्यात येणार असल्याच्या निर्णय पुण्यात पार पडलेल्या राज्यव्यापी व्यापारी परिषदेत मंगळवारी घेण्यात आला.**




### जाचक तरतुदी रद्द कराव्यात

बाजार समिती कायद्यातील बदलांसाठी कृती समितीच्या मागील सूचनांचा विचार करावा.अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातील जाचक तरतुदी रद्द कराव्यात. बाजार समिती परवाने तातडीने ऑनलाइन करावेत; अन्यथा व्यापारी नूतनीकरण करणार नाहीत, असे ठराव परिषदेत मांडण्यात आले.

मार्केट यार्ड येथील ‘दि पूना मर्चंट्स चेंबर’च्या व्यापार भवन सभागृहात मंगळवारी (१८ नोव्हेंबर) व्यापारी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत राज्यभरातील विविध व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. ‘महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (फॅम), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रीज अँड ट्रेड, ग्रेन, राईस, ऑइल सीड मर्चंट्स असोसिएशन (मुंबई), तसेच दि पूना मर्चंट्स चेंबरकडून या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.मुंबई, कोल्हापूर, सांगली, नाशिक, अहिल्यानगर, बारामती, लातूर, सोलापूर, पंढरपूर येथील व्यापारी संघटनांचे १२० प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झाले होते. जितेंद्र शहा परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते.व्यापार्‍यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असून, राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ५ डिसेंबर रोजी राज्यभरातील व्यापारी लाक्षणिक बंद पाळणार आहेत,’ असे दिलीप गुप्ता, मोहन गुरनानी भीमजी भानुशाली, राजेंद्र बाठिया यांनी सांगितले. रायकुमार नहार यांनी प्रास्ताविक केले. उत्तम बाठिया यांनी सूत्रसंचालन केले. ईश्वर नहार यांनी आभार मानले. बाजार समितीतील कायदे, राष्ट्रीय बाजार समिती प्रस्तावित धोरणातील त्रुटी, तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यान्वये व्यापार्‍यांवर होत असलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर परिषदेत सहभागी झालेल्या व्यापार्‍यांनी नाराजी व्यक्त केली. दिलीप गुप्ता, मोहन गुरनानी, भीमजी भानुशाली, राजेंद्र बाठिया, रायकुमार नहार, सुरेश चिक्कळी, संजय शेठ, सूर्यकांत पाठक, प्रवीण चोरबेले यांनी व्यापार्‍यांनी भेडसाविणार्‍या समस्या मांडल्या. खाद्यान्न, अन्नधान्यावर वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रद्द करावर२६ ऑगस्ट रोजी २०२४ रोजी मुंबईत उपमुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीतील मागण्यांबाबत निर्णय घ्यावा.

राष्ट्रीय बाजार समिती संदर्भातील प्रस्तावित अध्यादेशातील त्रुटी दूर करण्यासाठी कृती समितीसोबत चर्चा करावी.

## बिश्नोईला भारतात आणणार

## अमेरिकेकडून प्रत्यार्पणाची प्रक्रिया पूर्ण

# बिश्नोई काही तासांतच भारतात आणणार

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोईला अमेरिकेतून भारतात आणण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या गेल्या वर्षी झालेल्या हत्येचा मुख्य सूत्रधार अनमोल बिश्नोई असल्याचे मुंबई पोलिसांनी म्हटले आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, अनमोलला अमेरिकेतून भारताकडे प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.**

### अनमोल बिश्नोई तुरुंगात असलेला गँगस्टर





अनमोलवर देशभरात अनेक गुन्हे दाखल आहेत आणि त्याला कोणाच्या ताब्यात द्यायचे याचा निर्णय केंद्र सरकार घेणार आहे. आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, संबंधित अधिकारी अनमोलला घेऊन काही तासांत दिल्लीत पोहोचतील.बाबा सिद्दीकी यांचा मुलगा, माजी आमदार झीशान सिद्दीकी यांनीही द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, त्यांना आज अमेरिकन अधिकाऱ्यांकडून एक ईमेल आला होता. त्यामध्ये त्यांना सांगण्यात आले होते की, अनमोल बिश्नोईला अमेरिकन सरकारने अमेरिकेतून हद्दपार केले आहे. अनमोल हा सध्या तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ आहे.झीशान सिद्दीकी म्हणाले की, “मी पीडितेच्या कुटुंबातील असल्याने, माझा ईमेल अमेरिकन अधिकाऱ्यांकडे नोंदणीकृत आहे आणि ते मला या प्रकरणातील घडामोडींबद्दल माहिती देतात. आज सकाळी, मला एक ईमेल मिळाला ज्यामध्ये बिश्नोईला अमेरिकेतून हद्दपार करण्यात आल्याचे म्हटले आहे.”बाब सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी वांद्रे येथील त्यांच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात अनमोल बिश्नोई वॉन्टेड आरोपी होता.

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास करत २६ जणांना अटक केली आहे. आरोपपत्रात, गुन्हे शाखेने अनमोल बाब सिद्दीकी यांच्या हत्येचा सूत्रधार असल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपींच्या मोबाईल फोनमध्ये त्यांना अशा अनेक व्हॉइस क्लिप्स सापडल्या आहेत ज्या अनमोलशी संबंधित आहेत. कथित ऑडिओ क्लिपमध्ये, अनमोल लोकांना सूचना देताना आणि हत्या करण्यासाठी प्रवृत्त करत असल्याचे ऐकू येते.सिद्धू मूसेवाला प्रकरण आणि गेल्या वर्षी सलमान खानच्या घराबाहेर झालेल्या गोळीबारातही पोलिसांना हवा असलेल्या २६ वर्षीय अनमोल बिश्नोईला गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये अमेरिकन अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले होते. तेव्हापासून त्याला भारतात परत आणण्याची प्रक्रिया सुरू होती.गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोईला अमेरिकेतून भारतात आणण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या गेल्या वर्षी झालेल्या हत्येचा मुख्य सूत्रधार अनमोल बिश्नोई असल्याचे मुंबई पोलिसांनी म्हटले आहे. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, अनमोलला अमेरिकेतून भारताकडे प्रत्यार्पण करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

अनमोलवर देशभरात अनेक गुन्हे दाखल आहेत आणि त्याला कोणाच्या ताब्यात द्यायचे याचा निर्णय केंद्र सरकार घेणार आहे. आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, संबंधित अधिकारी अनमोलला घेऊन काही तासांत दिल्लीत पोहोचतील.बाबा सिद्दीकी यांचा मुलगा, माजी आमदार झीशान सिद्दीकी यांनीही द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, त्यांना आज अमेरिकन अधिकाऱ्यांकडून एक ईमेल आला होता. त्यामध्ये त्यांना सांगण्यात आले होते की, अनमोल बिश्नोईला अमेरिकन सरकारने अमेरिकेतून हद्दपार केले आहे. अनमोल हा सध्या तुरुंगात असलेला गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ आहे.झीशान सिद्दीकी म्हणाले की, “मी पीडितेच्या कुटुंबातील असल्याने, माझा ईमेल अमेरिकन अधिकाऱ्यांकडे नोंदणीकृत आहे आणि ते मला या प्रकरणातील घडामोडींबद्दल माहिती देतात.

### अनमोलवर देशभरात गुन्हे

अमेरिकेतून हद्दपार करण्यात आल्याचे म्हटले आहे.”बाबा सिद्दीकी यांची १२ ऑक्टोबर २०२४ रोजी वांद्रे येथील त्यांच्या कार्यालयाबाहेर गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात अनमोल बिश्नोई वॉन्टेड आरोपी होता. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास करत २६ जणांना अटक केली आहे. आरोपपत्रात, गुन्हे शाखेने अनमोल बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा सूत्रधार असल्याचे म्हटले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या आरोपींच्या मोबाईल फोनमध्ये त्यांना अशा अनेक व्हॉइस क्लिप्स सापडल्या आहेत.

# भारतीयांच्या ‘व्हिसा फ्री एन्ट्री’वर इराणची बंदी

## भारतीय प्रवाशांना व्हिसाशिवाय इराणमध्ये प्रवेश करता येणार नाही

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**इराणने सामान्य पासपोर्ट असलेल्या भारतीय नागरिकांसाठी व्हिसा सवलत रद्द करण्याची घोषणा केली आहे. २२ नोव्हेंबरपासून, भारतीय प्रवाशांना व्हिसाशिवाय इराणमध्ये प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिकांना इराणमध्ये प्रवेश करण्यासाठी आणि इराणमधून प्रवास करण्यासाठी आधीच व्हिसा घेणे बंधनकारक असणार आहे.**

पूर्वीच्या धोरणामुळे भारतीय पर्यटकांना काही अटींसह व्हिसाशिवाय इराणमध्ये प्रवेश करण्याची परवानगी होती. पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि आशियाई देशांशी संबंध मजबूत करण्यासाठी इराणने हा निर्णय घेतला होता. पण आता या बदलामुळे सामान्य पासपोर्ट असलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला इराणला जाण्यापूर्वी वैध व्हिसा मिळवणे आवश्यक असेल.नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रवाशांकडे विमानात चढण्यापूर्वी त्यांचा इराणी व्हिसा असणे आवश्यक आहे. हा नियम इराणी विमानतळावरून जाणाऱ्या प्रवाशांनाही लागू होणार आहे. त्यामुळे व्हिसाशिवाय कोणत्याही परदेशी व्यक्तीला इराणमधून प्रवास करता येणार नाही.



सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक स्थळांची संख्या अधिक असल्याने इराण भारतीय पर्यटकांसाठी एक लोकप्रिय ठिकाण आहे. पर्यटक अनेकदा इस्फहान आणि शिराझ सारख्या शहरांना त्यांची वास्तुकला पाहण्यासाठी भेट देतात, तर कोम आणि मशहद सारखी ठिकाणे तीर्थस्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत. इराणच्या वाळवंटातील भूदृश्ये आणि जुन्या सिल्क रोडकडेही अनेक पर्यटक आकर्षित होतात. तेहरानमधील भारतीय दूतावासाने एका निवेदनात म्हटले आहे की, व्हिसा फ्री धोरणामुळे अनेक भारतीय नागरिकांना नोकरी किंवा पुढील प्रवासाचे खोटे आश्वासन देऊन इराणमध्ये आणण्यात येते आणि नंतर खंडणीसाठी अपहरण करण्यात येते.

अशा अनेक घटना समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. “रोजगाराच्या खोट्या आश्वासनांवर किंवा पुढे कोणत्यातरी देशात नेण्याचे आश्वासन देऊन भारतीय नागरिकांना इराणमध्ये आणण्यात आल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. सामान्य भारतीय पासपोर्ट धारकांसाठी उपलब्ध असलेल्या व्हिसा सवलतीच्या सुविधेचा फायदा घेऊन या व्यक्तींना इराणमध्ये आणण्यात आले.

### फ्री धोरणाचा गैरवापर

तेहरानमधील भारतीय दूतावासाच्या निवेदनात म्हटले आहे.व्हिसा फ्री धोरणाचा पुढील गैरवापर टाळण्यासाठी इराण सरकारने आता २२ नोव्हेंबर २०२५ पासून सामान्य भारतीय पासपोर्ट धारकांसाठी व्हिसा फ्री प्रवेश रद्द केला आहे. त्यामुळे २२ नोव्हेंबरपासून भारतीयांना इराणमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा इराणमधून प्रवास करण्यासाठी व्हिसाची आवश्यकता असेल.

# सुष्मिता सेन आहे कोट्यवधींच्या संपत्तीची मालकीण



सुष्मिता सेन बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने अनेक चित्रपटांत काम करत तिच्या अभिनय कौशल्याने आणि सौंदर्याने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. अभिनयाचा कोणताही वारसा नसताना तिने स्वबळावर इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली.सुष्मिता सेनने वयाच्या अवघ्या विशीतच दोन मुलींना दत्तक घेतलं. तिने तिच्या दोन्ही मुलींचा एकटीने सांभाळ केला. अभिनेत्री अनेकदा तिच्या लेकींबरोबरचे फोटो व व्हिडीओ पोस्ट करत असते. सुष्मिता सोशल मीडियावरही खूप सक्रिय असते. पण, तुम्हाला माहीत आहे का मिस युनिवर्स असलेल्या सुष्मिता सेनची नेटवर्थ किती आहे?GQच्या वृत्तानुसार सुष्मिता सेनची नेटवर्थ जवळपास १०० कोटी रुपये इतकी आहे. ती अभिनयाबरोबर ब्रँड इंडोर्समेंटमधूनही पैसे कमावते. सुष्मिताचं मुंबईत आलिशान घरही आहे. या व्यतिरिक्त तिची मुंबईत इतर ठिकाणीही प्रॉपर्टी आहे. यासह तिच्या भारताबाहेरही काही प्रॉपर्टीज आहेत. सुष्मिता ब्रँडची जाहिरात करण्यासाठी ६० लाख रुपये इतकं मानधन घेते.सुष्मिता सेनचं दुबईत एक दागिन्यांचं दुकानही आहे. या व्यतिरिक्त तिची कंपन तंत्रा एंटरटेनमेंट ही निर्मिती संस्थाही आहे. सुष्मिताची सेसाजियोनी नावाची अजून एक कंपनी आहे. ही कंपनी स्पा सेंटर आणि हॉटेलशी संबंधित काम करते. सुष्मिताकडे या व्यतिरिक्त महागड्या गाड्यांचं कलेक्शनही आहे.सुष्मिताला लक्झरी गाड्यांची खूप आवड आहे. तिच्या गाड्यांच्या कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर तिच्याकडे मर्सडीज, AMG GLE53, BMW 7, लेक्सस LX 470, BMWX6, ऑडी Q7 आणि FIAT LINEA यांसारख्या गाड्या आहेत.सुष्मिता सध्या तिच्या रेने आणि अलिषा या दोन मुलींचं संगोपन करण्याकडे लक्ष केंद्रित करत आहे. ती या दोघींबरोबरचे अनेक फोटो व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट करत असते. तिच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर ती 'आर्या' वेब सीरिजमधून झळकलेली. याचे दोन सीझन आले आहेत.

# सूरज ला दिलेलं वचन अजित पवारांनी केलं पूर्ण



सूरज चव्हाणने नवीन घरात प्रवेश केला आहे. बारामतीजवळच्या मोढवे गावातील सूरज चव्हाणला घर बांधून देण्याचं वचन उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिलं होतं. त्यांनी ते वचन पूर्ण केलं आहे. सूरज चव्हाणच्या घराचं बांधकाम पूर्ण झालं असून आता तो या घरात राहायला गेला आहे. सूरजच्या घरानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. सूरज चव्हाणने गृहप्रवेशाचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. त्याच्या या व्हिडीओवर अजित पवारांनी कमेंट केली आहे. त्यांनी सूरजला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत."सूरज, नवीन घरासाठी आणि भावी आयुष्यासाठी तुला खूप शुभेच्छा!" अशी कमेंट सूरज चव्हाणच्या इन्स्टाग्राम पोस्टवर अजित पवारांनी केली आहे. दरम्यान, सूरज चव्हाणने चार दिवसांपूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेतली होती. अजित पवारांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर सूरज चव्हाणच्या भेटीचे व्हिडीओ शेअर करण्यात आले होते. "बारामतीचा सुपुत्र आणि बिग बॉस मराठी विजेता सुरज चव्हाण यानं आज माझी सदिच्छा भेट घेतली. त्याच्या नवीन घराचं बांधकाम उत्तमरित्या पार पडत असून त्याबद्दल त्यानं माझ्याकडे समाधान व्यक्त केलं. यावेळी सुरजला पुढील वाटचालीसाठी, आयुष्यातील नव्या टप्प्यासाठी शुभेच्छा दिल्या," असं कॅप्शनमध्ये लिहिलं होतं.सूरज चव्हाणने नवीन घरात प्रवेश केला आहे. बारामतीजवळच्या मोढवे गावातील सूरज चव्हाणला घर बांधून देण्याचं वचन उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिलं होतं. त्यांनी ते वचन पूर्ण केलं आहे. सूरज चव्हाणच्या घराचं बांधकाम पूर्ण झालं असून आता तो या घरात राहायला गेला आहे. सूरजच्या घरानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# अजिंक्य देव यांनी केलं रणबीर कपूरचं कौतुक

अजिंक्य देव मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते आहेत. त्यांनी आजवर अनेक चित्रपटांत काम केलं आहे. अजिंक्य येत्या काळात बॉलीवूडमधील बहुप्रतिक्षित चित्रपट 'रामायण'मधून झळकणार आहेत. अशातच आता त्यांनी या चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेला अभिनेता रणबीर कपूरबद्दल सांगितलं आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित आणि नमित मल्होत्रा निर्मित 'रामायण' या चित्रपटात रणबीर कपूर मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या चित्रपटात त्याच्यासह बॉलीवूडमधील, दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील आणि मराठी सिनेसृष्टीतील अनेक लोकप्रिय कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहेत. या चित्रपटात अजिंक्य देव रणबीर कपूर साकारत असलेल्या प्रभू श्री रामांच्या गुरूंची विश्वमित्र यांची भूमिका साकारणार आहे.अजिंक्य देवने अशातच रणबीर कपूरबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत त्याचं कौतुक केलं आहे.'

# पण मी खूश नाही

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे मराठमोळी निक्की तांबोळी घराघरांत पोहोचली. निक्कीने काही दाक्षिणात्य चित्रपटही केले आहेत. आता ती 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या शोचा एक प्रोमो व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये निक्की ढसाढसा रडताना दिसत आहे, त्यामुळे निक्कीला नेमकं झालंय तरी काय? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. सोनी टीव्हीच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'चा एक प्रोमो शेअर करण्यात आला आहे, ज्यामध्ये ती रडताना दिसते. "मागील तीन वर्षांत मी हिट रिॲलिटी शो दिले आहेत, पण तरीही मी खूश नाहीये. मी आनंद शोधतेय," असं निक्की रडत रडत म्हणते. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या डोळ्यांतही पाणी येतं. त्यानंतर शेफ रणवीर ब्रार व फराह खान निक्कीशी बोलताना दिसतात. निक्कीला ती काय बनवतेय, असं ते विचारतात. त्याचं निक्की उत्तर देते. यावेळी निक्की गोंधळलेली दिसते. चिप्स कुठे आहेत, असं रणवीर तिला विचारतात. त्यावर ती बनवू शकली नाही असं उत्तर देते. हे ऐकून फराह खान व विकास खन्ना यांना धक्का बसतो.पुढे निक्की रडत म्हणते, "मी खूप मेहनत करतेय, मला शो मिळत आहेत, पण मी खूश नाहीये. कधी कधी मला वाटतं की मी या सगळ्या गोष्टींसाठी पात्र नाही." निक्कीचं बोलणं संपल्यावर हा प्रोमो संपतो. निक्की नेमकी कशामुळे रडते, काय घडलंय, ते एपिसोड प्रसारित झाल्यावरच कळेल.निकी तांबोळीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली होती. २०१९ मध्ये, तिने 'चिकाती गडिलो चिथाकोट्टडू' या तेलुगू हॉरर कॉमेडी चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं होतं.



# मराठमोळ्या राधिका भिडेचं नवीन गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

'मन धावतंया तुझ्याच मागं...' हे गाणं सध्या प्रत्येकाच्याच सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. फेसबुक असो, इन्स्टाग्राम असो किंवा कुणाचे व्हॉट्सअप स्टेट्स असोत... सगळीकडे फक्त हेच गाणं ऐकायला मिळत आहे. हे गाणं गायलं आहे, मराठमोळ्या राधिका भिडेने. अशातच I-POPSTAR या रिॲलिटी शोमधून सर्वांचं लक्ष वेधून घेणाऱ्या राधिकाला मराठी सिनेमासाठी गाणं गाण्याची मोठी संधी मिळाली आहे. नऊवारी साडी, नाकात नथ आणि कपाळावर चंद्रकोर लावून एका रिॲलिटी शोमध्ये गाणारी राधिका भिडेची सध्या सगळीकडेच चर्चा सुरू आहे. राधिका भिडे कोकणकन्याने आपल्या गोड आवाजात हिंदी शोमध्ये मराठी गाणं गाऊन सगळ्यांना मराठीच्या प्रेमात पाडलं आहे. मधाळ हास्याबरोबरच राधिकाचा सुमधुर आवाज अनेक संगीतप्रेमींच्या मनात घर करून गेला आहे.आता राधिका तिच्या आगामी नव्या गाण्यातून प्रेक्षकांच्या भेटीला




येणार आहे. या गाण्याद्वारे ती पार्श्वगायनात पदार्पण करीत आहे. रेणुका शहाणे यांच्या 'उत्तर' या आगामी सिनेमातल्या 'हो आई...' या गाण्यासाठी राधिकाने पार्श्वगायन केलं आहे. नुकतीच या गाण्याची झलक सोशल मीडियावर शेअर करण्यात आली आहे. आपल्या पहिल्या सिनेमातल्या गाण्यासाठीचा अनुभवही राधिकानं शेअर केला आहे.राधिका म्हणाली, "मराठी चित्रपटासाठी माझं पाहिलं गाणं येत आहे. 'उत्तर' या सिनेमासाठी मी पहिलं पार्श्वगायन करीत आहे आणि यानिमित्ताने मी पार्श्वगायनात पदार्पण करीत आहे. दरवेळी आपली आई आपल्याला गिफ्ट देत असते. यावेळी आपण आपल्या आईला काहीतरी गिफ्ट देऊ. जसं हे गाणं मी माझ्या आईला गिफ्ट म्हणून देणार आहे."राधिका भिडेच्या आवाजातलं 'हो आई...' या गाण्याचं संगीत लोकप्रिय मराठी संगीतकार अमितराज आहे. तर या गाण्याचे शब्द गीतकार-लेखक क्षितीज पटवर्धनने केलं आहे.

## बंगाल क्रिकेट असोसिएशनची माहिती

## विमान प्रवास करण्यास डॉक्टरांनी घातली बंदी

# गिल दुसऱ्या कसोटीतून बाहेर?

## शुबमन गिलला मानेच्या दुखापत

## दुखापतीनंतर हॉस्पिटलमध्ये दाखल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल सध्या मानेच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे. पहिल्या कसोटीदरम्यान खेळताना शुबमन गिलच्या मानेत अचानक चमक भरल्याने तो मैदानाबाहेर गेला आणि नंतर त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आलं. यानंतर आता तो दुसऱ्या कसोटीतून जवळपास बाहेर पडल्याची माहिती समोर आली आहे.**





आणि त्यानंतर तो रिटायर्ड हर्ट होत मैदानाबाहेर परतला. मैदानाबाहेर गेल्यानंतर गिलला दिवसाचा खेळ संपल्यानंतर स्ट्रेचरवरून रूग्णालयात नेण्यात आलं. तिथे त्याच्यावर उपचार केल्यानंतर १७ नोव्हेंबरला त्याला डिस्चार्ज देण्यात आला. गिल रूग्णालयाबाहेर येत असतानाचा त्याचा व्हीडिओ समोर आला होता. ज्यामध्ये गिलच्या मानेला पट्टा दिसत होता. शुबमन गिलच्या अनुपस्थितीमुळे टीम इंडिया पहिल्या कसोटीत ९ फलंदाजांसह खेळली होती.

बंगाल क्रिकेट असोसिएशनमधील सूत्रांनी पीटीआयला माहिती दिली आहे की गिल गुवाहाटीला जाणार नाही. डॉक्टरांनी गिलला सध्या विमान प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी गिलला विमानाने जाऊ नये असं सांगितलं आहे आणि म्हणूनच तो गुवाहाटीला जाणार नाहीये.कोलकाता येथील पहिल्या कसोटी सामन्यातील दारुण पराभवानंतर, दुसरी कसोटी टीम इंडियासाठी महत्त्वाची असणार आहे. गुवाहाटीतील बाराबाती स्टेडियमवरील विजय हा मालिका पराभव टाळण्याचा एकमेव मार्ग आहे. पहिल्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करत असताना चौकार मारल्यानंतर गिलच्या मानेत उसण भरली आणि त्यानंतर तो रिटायर्ड हर्ट होत मैदानाबाहेर परतला.मैदानाबाहेर गेल्यानंतर गिलला दिवसाचा खेळ संपल्यानंतर स्ट्रेचरवरून रूग्णालयात नेण्यात आलं. तिथे त्याच्यावर उपचार केल्यानंतर १७ नोव्हेंबरला त्याला डिस्चार्ज देण्यात आला. गिल रूग्णालयाबाहेर येत असतानाचा त्याचा व्हीडिओ समोर आला होता. ज्यामध्ये गिलच्या मानेला पट्टा दिसत होता. शुबमन गिलच्या अनुपस्थितीमुळे टीम इंडिया पहिल्या कसोटीत ९ फलंदाजांसह खेळली होती. आता गिलच्या दुखापतीमुळे तो दुसऱ्या सामन्यात खेळणार नसल्याची शक्यता वाढत आहे.पीटीआयच्या वृत्तानुसार, शुबमन गिलला पुढील चार दिवस विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे. डॉक्टरांच्या निर्णयामुळे त्याला दुसऱ्या कसोटीसाठी संघाबरोबर गुवाहाटीला प्रवास करणं कठीण असल्याचं अहवालात म्हटलं आहे. गिलच्या दुखापतीचे दररोज मूल्यांकन केले जात आहे आणि त्याच्या गुवाहाटीच्या प्रवासाबाबत अंतिम निर्णय मंगळवारी घेतला जाऊ शकतो.

कोलकाता कसोटीत भारताच्या पहिल्या डावात फलंदाजी करताना शुबमन गिलला दुखापत झाली. तो ३ चेंडूत ४ धावा केल्यानंतर दुखापतीमुळे रिटायर्ड झाल्यानंतर त्याला सकाळपासून मानेत चमक भरल्याचा त्रास होत असल्याचा सराव सत्रादरम्यानचा व्हीडिओही समोर आला होता. कदाचित गिल रात्री नीट न झोपल्याने त्याच्या मानेत उसण भरली असावी, असं गोलंदाजी कोच मॉर्ने मॉर्कलने सांगितलं. बीसीसीआयने अद्याप शुबमन गिलच्या दुखापतीनंतर तो दुसरा कसोटी सामना खेळणार की नाही याबाबत कोणतेही अपडेट दिलेले नाहीत. गिलच्या अनुपस्थितीत साई सुदर्शनला प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते. तर ऋषभ पंत संघाचं नेतृत्त्व करताना दिसेल. भारतीय संघाचा कर्णधार शुबमन गिल सध्या मानेच्या दुखापतीमुळे त्रस्त आहे. पहिल्या कसोटीदरम्यान खेळताना शुबमन गिलच्या मानेत अचानक चमक भरल्याने तो मैदानाबाहेर गेला आणि नंतर त्याला रूग्णालयात दाखल करण्यात आलं. यानंतर आता तो दुसऱ्या कसोटीतून जवळपास बाहेर पडल्याची माहिती समोर आली आहे. बंगाल क्रिकेट असोसिएशनमधील सूत्रांनी पीटीआयला माहिती दिली आहे की गिल गुवाहाटीला जाणार नाही. डॉक्टरांनी गिलला सध्या विमान प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी गिलला विमानाने जाऊ नये असं सांगितलं आहे आणि म्हणूनच तो गुवाहाटीला जाणार नाहीये.कोलकाता येथील पहिल्या कसोटी सामन्यातील दारुण पराभवानंतर, दुसरी कसोटी टीम इंडियासाठी महत्त्वाची असणार आहे. गुवाहाटीतील बाराबाती स्टेडियमवरील विजय हा मालिका पराभव टाळण्याचा एकमेव मार्ग आहे. पहिल्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात फलंदाजी करत असताना चौकार मारल्यानंतर गिलच्या मानेत उसण भरली .

# कोणाला मारू, हरमनप्रीत आहे का मी?

## कॅप्टनचं ज्युनिअर क्रिकेटपटूंना मारहाणीच्या आरोपांवर मोठं वक्तव्य

## पण हा सर्वस्वी माझा प्रश्न आहे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बांगलादेश महिला संघाची कर्णधार निगार सुल्ताना हिने ज्युनियर महिला क्रिकेटपटूंना मारहाण केल्याच्या आरोपांवर वक्तव्य केलं आहे. निगार सुल्तानाने हे आरोप फेटाळू न लावले आहेत. या आरोपांबाबत बोलताना भारताची वर्ल्डकप विजेती महिला कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या नावाचा उल्लेख केला आहे. यामुळे निगार सुल्ताना हिचं वक्तव्य सध्या चांगलंच व्हायरल होत आहे.**





बांगलादेशची कर्णधार निगार सुल्ताना मारहाण करण्याच्या आरोपांवर म्हणाली, "मी कोणाला का मारेन? म्हणजे मी स्टंपवर बॅट मारेन तरी कशाला? मी हरमनप्रीत आहे का, की जी रागात स्टंपवर बॅट मारत फिरू? मी असं का करीन? माझ्या वैयक्तिक जीवनात मी स्वयंपाक करत असेन किंवा इतर काही करत असेन, मी इथे तिथे कुठेही बॅट आपटेन, मी हेल्मेटवर, पण हा सर्वस्वी माझा प्रश्न आहे.

बांगलादेश संघाची कर्णधार निगार सुलताना सध्या मोठ्या वादामध्ये अडकली आहे. संघातील वेगवान गोलंदाज जहानारा आलम हिने आरोप केला आहे की तिने संघातील ज्युनियर खेळाडूंशी गैरवर्तन केलं, इतकेच नव्हे तर त्यांना मारहाण करण्यापर्यंत गोष्ट गेल्याचं तिने सांगितलं. यावर बोलताना निगार सुल्तानाने हरमनप्रीत कौरच्या नावाचा उल्लेख केला.२०२३ मध्ये भारताच्या बांगलादेश दौऱ्यात हरमनप्रीतला पायचीत बाद दिल्यानंतर रागाच्या भरात तिने स्टंप्सवर बॅट आपटली होती. नंतर, हरमनने सामन्यानंतरच्या सादरीकरणात पंचांविषयीही वक्तव्य केलं होतं आणि ट्रॉफी फोटो सेशन दरम्यान बांगलादेशी खेळाडूंना टोमणे मारले होते.सध्या ऑस्ट्रेलियात राहणाऱ्या जहांआरा आलमने अलीकडेच खुलासा केला होता की, ज्युनियर क्रिकेटपटूंनी तिला फोन करून सुलताने त्यांना मारहाण केल्याचा दावा केला होता. बांगलादेशच्या कर्णधाराने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आणि म्हटलं की जर असं घडलं असतं तर ज्युनियर खेळाडूंनी परदेशात राहणाऱ्या एखाद्या व्यक्तीला फोन करण्याऐवजी इथे वरिष्ठांना कळवलं असतं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार।
। दि. 18 नोव्हेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सार्वजनिक विश्वस्त अधिनियम सुधारणा विधेयकास मान्यता

# देवस्थान ट्रस्टमध्ये गुरव-पुजारी समाजाच्या प्रतिनिधीत्वाला 'बळ'!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील देवस्थान ट्रस्टच्या व्यवस्थापनात गुरव आणि पारंपरिक पुजारी समाजाला 'हितसंबंधी व्यक्ती' म्हणून मान्यता मिळवून देण्याच्या मागणीला बळ मिळाले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. आता शासकीय विधेयक मांडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्यभरातील देवस्थाने, मंदिर ट्रस्ट आणि धर्मादाय संस्थांच्या व्यवस्थापनात महत्त्वाचा निर्णय आहे.**




विधानसभा पावसाळी अधिवेशनादरम्यान भाजपा आमदार महेश लांडगे यांनी या संदर्भात मांडलेल्या अशासकीय सुधारणाविधेयकाला मोठा प्रतिसाद मिळाला होता. गुरव-पुजारी समाजाची पारंपरिक सेवा, मंदिरातील दैनंदिन उपक्रमांतील त्यांचे योगदान आणि कोरोनाकाळात या समाजावर आलेले आर्थिक संकट याची दखल घेत राज्य सरकारने आता कायद्यामध्ये अपेक्षित बदल करावे, अशी मागणी लांडगे यांनी केली होती.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, देवस्थान ट्रस्टमध्ये गुरव, परंपरागत पुजारी, मानकरी आणि मंदिरसेवक यांना 'हितसंबंधी व्यक्ती'चा कायदेशीर दर्जा मिळेल. धर्मादाय आयुक्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या हजारो मंदिरांमध्ये दैनंदिन पूजा-अर्चा करणाऱ्या समाजाला यानंतर विश्वस्त व्यवस्थेत स्थान मिळण्याची कायदेशीर हमी प्राप्त होणार आहे.

> "गुरव-पुजारी समाज हा शतकानुशतकांची परंपरा लाभलेला, देवस्थानांची सेवा करणारा समाज आहे. मंदिर संस्कृती, पूजा-अर्चा, वाद्यवृंद, दिवाबत्ती, गावातील धार्मिक कार्य यांमधून त्यांनी देव, देश आणि धर्मासाठी सातत्याने काम केले आहे. त्यांची सेवा, हक्क आणि कर्तव्य यांचे संरक्षण व्हावे, यासाठी सुधारणा अशासकीय विधेयक मांडले होते. आता मंत्रिमंडळाने ते मान्य केल्यामुळे शासकीय विधेयक मांडण्याचा मार्ग मोकळा झाला. परिणामी, हजारो कुटुंबांना न्याय मिळणार आहे. आज झालेल्या कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत विश्वस्त अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा महायुती सरकारचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.
> -- **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

**राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांचे आश्वासन प्रत्यक्षात**

विधानसभा अधिवेशनात उत्तर देताना राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी "देवस्थानांच्या सेवेत आयुष्य घालवणाऱ्या समाजाला व्यवस्थापनात स्थान मिळालेच पाहिजे" असे नमूद केले होते. मंत्रिमंडळातील मंजुरीमुळे ते आश्वासन आता प्रत्यक्षात उतरले आहे. पुढील टप्प्यात सुधारणा अधिनियमाचे शासकीय विधेयक मांडले जाईल. राज्यातील गुरव, पुजारी, सेवाधारी आणि मानकरी समाजासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, देवस्थान व्यवस्थेत त्यांचा सहभाग सुनिश्चित होणार आहे.

## दोन प्रभागांत आरक्षणातील दुरुस्तीमुळे राजकीय चित्र बदलले!

### प्रभाग 30 मध्ये शेंडगे यांना लाभ, तर बदलामागे उपमुख्यमंत्री अजित पवारांची 'कायदेशीर चाल' चर्चेत

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरक्षण सोडतीतील तांत्रिक त्रुटी दुरुस्त करत राज्य निवडणूक आयोगाने प्रभाग 19 आणि 30 मधील चार जागांचे आरक्षण बदलताच स्थानिक राजकारणात खळबळ उडाली आहे. या दुरुस्तीचा थेट राजकीय फायदा भाजपाच्या माजी नगरसेविका आशा शेंडगे यांना झाला असून, या बदलासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार कायदेशीर बाबींचा अचूक वापर केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.**




**प्रभाग 30 मधील बदल शेंडगे यांच्यासाठी 'गेमचेंजर'**

प्रभाग 30 मध्ये आधी ओबीसी पुरुषांसाठी असलेली 'क' जागा आता ओबीसी महिला प्रवर्गात बदल केली आहे. त्यामुळे या प्रभागातून लढण्याचा मार्ग एकप्रकारे बंद झालेल्या माजी नगरसेविका आशा शेंडगे यांना पुन्हा सरळ उमेदवारीची संधी निर्माण झाली आहे. पूर्वीच्या आरक्षणात त्यांना कुटुंबातील एखाद्या पुरुष सदस्याला उमेदवारी द्यावी लागणार होती. मात्र आता बदलामुळे शेंडगे स्वतःच निवडणूक रिंगणात उतरण्यास मोकळ्या झाल्या आहेत. स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्येही या दुरुस्तीबद्दल समाधानाचे वातावरण आहे.

**'कायदेशीर अचूक चाल' – अजित पवारांच्या भूमिकेची चर्चा**

या दुरुस्तीमुळे प्रभाग 19 आणि 30 मधील आरक्षणांचे गणित पूर्णतः बदलले असले तरी, राजकीय वर्तुळात अजित पवारांच्या भूमिकेची जोरदार चर्चा आहे. या प्रभागात आता राष्ट्रवादीचे पॅनेलसुद्धा स्ट्रॉंग झाले आहे. विशेष म्हणजे, निवडणूक आयोगाने अनुसूचित जाती/जमाती आरक्षण असलेल्या प्रभागांमध्ये ओबीसी महिला आरक्षणाची सक्ती असल्याचे कारण देत दुरुस्ती केली. परंतु, ही कमतरता 'कायदेशीर बाबींचा अचूक अभ्यास' करून दाखवण्यात आल्यानेच आयोगाला बदल करावा लागला, असा दावा पिंपरी-चिंचवडमधील काही वरिष्ठ नेते करताना दिसत आहेत. त्यामुळे ही दुरुस्ती केवळ नियमांनुसार झाली की त्यामागे अजित पवारांची रणनीती होती, यावर आता राजकीय भाष्य चर्चेत आहे.

> कासारवाडी आणि परिसरामध्ये मी विकासकामांद्वारे कायापालट केला आहे. मी केलेले काम लोकांच्या समोर आहे. ज्यावेळी भाजपाकडे कोणी नव्हते, त्यावेळी आम्ही काम सुरू केले आहे. भाजपाचे पॅनेल प्रभागात सक्षम होईल. आम्ही पुरूष उमेदवार लढवण्याचा कोणताही विचार केला नव्हता. पण, केलेल्या चांगल्या कामाची पोहोच पावती मिळाली आणि आरक्षणामध्ये बदल झाला. त्यामुळे निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'मेरिट' च्या आधारे आम्ही सक्षम आहोत. **–आशा शेंडगे,** मा. नगरसेविका.

**दोन प्रभागांचे बदललेले आरक्षण पुढीलप्रमाणे :**

**प्रभाग 19 –**

अ : अनुसूचित जाती (महिला)
ब : ओबीसी, क : सर्वसाधारण (महिला), ड : सर्वसाधारण

**प्रभाग 30 –**

अ : अनुसूचित जाती, ब : अनुसूचित जमाती (महिला), क : ओबीसी (महिला), ड : सर्वसाधारण

उमेदवारांच्या गणितात फेरबदल, हरकतींसाठी २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत

या दुरुस्तीमुळे अनेक इच्छुकांना आपली रणनीती नव्याने आखावी लागणार असून, अनेक प्रभागांमध्ये संभाव्य उमेदवारांचे समीकरण बदलले आहे. आरक्षणाबाबत हरकती नोंदवण्यासाठी २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत ठेवण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन पवार यांनी दिली.

## पुन:श्च विश्वविक्रमाच्या दिशेने वाटचाल:

# ‘रिव्हर सायक्लोथॉन’साठी 25 हजार सायकलपटूंची नोंदणी पूर्ण!

### ऐतिहासिक उपक्रमासाठी उरले 5 दिवस, उत्कंठा शिगेला; आ. महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पर्यावरणाचा संदेश

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या ‘रिव्हर सायक्लोथॉन 2025’ या भव्य उपक्रमाला पुणे- पिंपरी-चिंचवडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. डुडूळगाव, मोशी येथील ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता होणाऱ्या या सायक्लोथॉनसाठी आतापर्यंत २५ हजाराहून अधिक सायकलपटूंची नोंदणी पूर्ण झाली असून, अवघे ५ दिवस शिल्लक असताना आणखी मोठ्या प्रमाणावर नोंदणी वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.**




> “रिव्हर सायक्लोथॉनमध्ये २५ हजार सायकलपटूंनी नोंदणी करून दिलेला प्रतिसाद प्रेरणादायी आहे. आता उरलेले पाच दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. अधिकाधिक नागरिकांनी यात सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश संपूर्ण जगापर्यंत पोहोचवावा. मोशी येथील नव्या ठिकाणी सर्व सुविधा, सुरक्षा व पार्किंगची योग्य व्यवस्था केली आहे. चला, इंद्रायणी नदीसाठी, पर्यावरणासाठी आणि भावी पिढ्यांसाठी एकत्र येऊ आणि नवा इतिहास घडवूया.”
> **– डॉ. निलेश लोंढे,** मुख्य समन्वयक, रिव्हर सायक्लोथॉन.

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर होणारा सायक्लोथॉन यंदा प्रथमच नव्या, अधिक प्रशस्त आणि सुव्यवस्थित ठिकाणी मोशी येथे आयोजित केली जात आहे. पुणे–नाशिक महामार्गालगतचे हे ठिकाण मोठ्या सहभागासाठी अधिक योग्य असल्याने, आयोजकांकडून ३५ हजाराहून अधिक सायकलपटूंच्या सहभागाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे गतवर्षी या सायक्लोथॉनची -जगातील सर्वात लांब सायकल रांग’ म्हणून ‘गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये नोंद झाली आहे. आता पुन्हा एकदा यंदाची सायक्लोथॉन नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

या उपक्रमाचे संयुक्त आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन करीत असून, पर्यावरण संवर्धन, आरोग्य आणि नदी स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोचवणे हा उद्देश आहे.

# विहिरीत पडलेल्या बैलाची केली सुखरूप सुटका

### नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी, १८ नोव्हेंबर : पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील चऱ्होली बुद्रुक येथील वडमुखवाडी भागातील तापकीरनगर परिसरात एका विहिरीत बैल पडल्याची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागाला मिळाली होती. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या चोवीसवाडी उप-अग्निशमन केंद्रातील पथकाने घटनास्थळी धाव घेत विहिरीमध्ये पडलेल्या बैलाला स्थानिकांनी बोलविलेल्या क्रेनच्या व स्थानिक मदतीला धावून आलेल्या नागरिकांच्या सहाय्याने बाहेर काढत त्याचे प्राण वाचवले. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली.**



अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी गेल्यानंतर विहिरीमधून बैल बाहेर काढण्यासाठी स्थानिकांनी क्रेन बोलवली. त्यानंतर क्रेनच्या सहाय्याने आणि स्थानिकांच्या मदतीने पथकाने बचावकार्य सुरू केले. विहिरीत उतरून रेस्क्यू बेल्ट आणि दोरीच्या मदतीने बैलाला विहिरीतून सुखरूप बेल्टच्या साह्याने बांधून बाहेर काढले. या बचावकार्यामध्ये चोवीसावाडी उप-अग्निशमन केंद्राचे जवान अमोल रांजणे, विशाल पोटे, ऋषिकेश रांजणे, शुभम बोराडे, संस्कार चव्हाण, सचिन ठोसरे यांनी सहभाग घेतला.

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये तात्काळ १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा, महापालिका अग्निशमन विभाग आपल्या मदतीसाठी तत्पर आहे.

www.rklgis.org

RKL GALAXY International School

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs: Robotics, Dance, Music, Speech & Drama, Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046